Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

Volume-VIII, Issue-II
April - June - 2019
Marathi / English Part - II / Hindi

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com




Ajanta
Prakashan

Off. Principal

# १६. चक्रवर्ती सम्राट अशोकांनी बौध्द धर्म का स्विकारला ?

प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी, जि. भंडारा.

**प्रस्तावणा**

चक्रवर्ती अशोक सम्राट हे मौर्य घराण्यातील महान व प्रसिध्द सम्राट होते. त्यांनी अखंड भारतावर राज्य केले. मौर्य घराण्याचा संस्थापक व पराक्रमी अशा चंद्रगुप्त मौर्याचा नातू व बिंदूसारचा मुलगा होता त्यांच्या आईचे नाव धर्मा असे होते. बिंदुसारच्या काळात अशोकाचा मोठा भाऊ सुशिम हा तक्षसिलेचा राज्यपाल होता. त्यावेळी तक्षशिलेच्या जनतेनी जुलमी अधिकाऱ्यांच्या विरोधात बंड केले. हे बंड मोडून काढण्यात सुशिम अपयशी ठरला म्हणुन बिंदूसारने हे बंड मोडून काढण्यासाठी अशोकाला पाठविले. अशोकानी ते बंड यशस्वीरीत्या मोडून काढले. त्यावेळी अशोक उज्जयनीचा राज्यपाल होता.

बिंदूसारला अनेक राण्या व मुले होती. सर्वात मोठा आणि सुंदर सुशिम होता. इ.स. पूर्व 273 मध्ये बिंदूसारचा मृत्यु झाला आणि त्यानंतर भावा – भावांमध्ये गट निर्माण झाले. एका बाजुला अशोक व त्याचा लहान भाऊ तिष्य तर दुसऱ्या बाजूला सुशिम व त्यांचे इतर भाऊ. या दोन गटात युध्दाला सुरूवात झाली व ते 3–4 वर्षे चालले त्यात सुशिम आपल्या भावांसह मारल्या गेला. अशाप्रकारे विरोधकांशी लढुन आपला मार्ग निष्कंटक करून अशोकांनी इ.स. पूर्व 269 मध्ये स्वतःचा राज्याभिषेक केला व तो अखंड भारताचा सम्राट बनला.

सम्राट अशोक हा उत्कृष्ट योध्दा राज्यकर्ता आणि सेनापती होता. राज्याभिषेकानंतर त्याने अनेक मोहीमा काढून संपूर्ण भारत आपल्या नियंत्रणाखाली आणला. एका–मागोमाग एक प्रांत जिंकण्याचा सपाटा सुरू केला त्यात कित्येक लोकांच्या कत्तली झाल्या, कित्येकांचे घर उजाळले, कित्येक पोरखे झाले त्यामुळे अशोकाला चंड–अशोक, क्रुरकर्मा अशी त्याची ओळख होवू लागली. पूर्व–पश्चिम, उत्तर – दक्षिण अशी सर्वत्र सम्राट अशोकाची सत्ता पसरली होती. जवळपास संपूर्ण भारत आपल्या नियंत्रणाखाली आणून भारताचा एकमेव चक्रवती सम्राट बनला.

**कलिंगचे युध्द इ.स. पूर्व 261**

कलिंग युध्द ही जगाच्या इतिहासातील एक क्रांतिकारक घटना समजली जाते. या युध्दामुळे सम्राट अशोकाच्या आचार–विचारात क्रांतीकारी बदल घडून आले. बिंदूसारच्या मृत्यूनंतर सम्राट अशोकाच्या ताब्यात जवळपास संपूर्ण भारत आला होता. पूर्व–पश्चिम, उत्तर – दक्षिण असे साम्राज्य पसरले होते. गोदावरी व महानदी यांच्या दरम्यान कलिंग हे छोटे व स्वतंत्र राज्य होते. कलिंगमधील लोक अत्यंत पराक्रमी आणि स्वतंत्रप्रेमी होते. त्यामुळे आतापर्यंत त्यांनी कलिंग राज्यावर कोणाचेही आक्रमण होवु दिले नाही. पराक्रमी अशा चंद्रगुप्त मौर्यानी सुध्दा कलिंगवर आक्रमण करण्याची हिंमत केली नाही. कलिंग प्रदेश सपन्न व समृध्द असा प्रदेश होता. असा सुपीक प्रदेश आपल्या ताब्यात असावा अशी तीव्र महत्वकांक्षा सम्राट अशोकाची होती त्यामुळे अशोकानी कलिंगवर आक्रमण



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Ref No.
Dt.

करण्याचे ठरविले. त्यासाठी सम्राट अशोकानी जय्यत तयारी केली आणि इ.स. पूर्व 261 मध्ये कलिंगवर आक्रमण केले. मेगास्थनीसच्या दिलेल्या माहितीवरून कलिंग राज्यात 8,000 पायदळ, 1,000 घोडेस्वार जय्यत तयार होते. दोन्ही पक्षात घनघोर युध्दाला सुरूवात झाली. परंतू अशोकाच्या सैन्य सामर्थ्यापुढे कलिंगचे सामर्थ्य कमी पडले व शेवटी अशोकाला विजय मिळाल व कलिंग आता मौर्य साम्राज्यात विलीन झाला.

**परिणाम**

युध्दसमाप्तीनंतर पाहणी केल्यानंतर असे दिसुन आले की, एक लाख सैनिक मारले गेलेत, दीड लाख युध्द कैदी म्हणुन पकडले गेलेत. कित्येक लोक जखमी झालेत. रणांगणात रक्ताचा पाठ वाहू लागला. जखमी लोकांच्या अंगातून रक्त वाहत होते आणि त्यांना पशू–पक्षी टोचत व मासाचे लचके तोडतांना त्यांना ज्या वेदना होत होत्या त्या वेदनेनी ती जिवंत माणसे ओरडत होती. जखमी अवस्थेत रणभूमीत पडलेली होती. मृताचे ढीग होतं, रक्ताची नदी वाहत होती रणभूमीत पडलेल्या जखमीना पाणी पाजण्यासाठी कोणी नव्हते. पाणी–पाणी म्हणून ही जखमी माणसे ओरडत होती.

युध्दानंतर उद्‌भवलेली रोगराई व दुष्काळ यामुळे हजारो कुटूंबाची वाताहत झाले, अनेक घरे पोरके झालेत. हे सर्व दृष्ट एका विजयी राजाने स्वतःच्या डोळयांनी बघीतल. युध्दात पराभूत झालेल्या लोकांना युध्दकैदी म्हणुन पकडण्यात आले. त्यांच्याकडे बघुन त्यांच्यातील लढण्याची महत्वकांक्षा नष्ट झाली असे वाटत होते. रणभूमीतील जखमींना विवळतांना पाहून अशोकाचे हृदय प्रवले आणि मृतांच्या ढिगाऱ्यातून एक नवीन राजा उदयाला आला. अशोक स्वतःच्या मनाला विचारू लागला की, आपण जे केले ते योग्य आहे कां? केवळ वैयक्तीक स्वार्थापोटी निरपराध जित्याजागत्या लोकांचा बळी घेतला. सुखी व समृध्द प्रजेला महत्वाकांक्षेपोटी छेडले व विनाशाच्या गर्दीत फेकले या सर्व गोष्टींचा सम्राट अशोकाच्या मनावर परिणाम झाला आणि त्यांनी स्वतः विचारले की, सुखी व समृध्द प्रजेवर आक्रमण करून आपण काय मिळवले तर, निर्जीव दगड–धोंडे व माती आणि काय गमावले तर जित्या–जागत्या माणसाची मणे ही काही माणसे कलिंग युध्दानंतर जिवंत होती ती अशोकाचा द्वेष करीत होती. राज्य बनतो तो तेथील सजीव माणसांनी ना की निर्जीव दगड–धोंडयानी एका महत्वाकांक्षेपोठी एवढा विनाश घडुन आला यात अशोकाला फार वाईट वाटल आणि दुःखी अंतकरणानी त्यांनी आपला पश्चाताप व्यक्त केला. व कलिंगच्या शिलालेखात लिहून ठेवला. पराभूतांवद्दल दुःख (शोक) व्यक्त करणारा अशोकापेक्षा जगाच्या इतिहासात दुसरा कोणताही राजा नाही. विजय मिळाल्याची खुशी मणवण्या ऐवजी पराभूताची दैन्यवस्था बघून अशोकाच्या जिवणातच नाही तर मगध साम्राज्य (राजकारणाला) व जगाच्या इतिहासात हे युध्द क्रांतीकारी ठरले. युगप्रवर्तक ठरले. सम्राट अशोकांनी कलिंगचा विनास बघुन यांनतर काधीही तलवार हातात घेणार नाही अशी शपथ घेतले व नंतर तलवारीला म्यानमध्ये टाकले व हयानंतर शांतीचा अहिंसा व समाजोन्नतीचा मार्ग पत्करण्याचे ठरविले. अशातच अशोकाची भेट बौध्दभीक्षु उपगुप्ता सोबत झाली. उपगुप्तांनी त्याला उपदेश केल्याने अशोकाने बौध्द धर्माचा स्विकार केला. म्हणजेच बौध्दभीक्षु उपगुप्तच्या मदतीने, सल्ल्यानी अशोकानी बौध्दधर्म स्विकारला. यानंतर जगाला जिंकुण घ्यावयाचे ते युध्दाने नव्हे तर प्रेमाने.

बौध्द धर्माचा स्वीकार केल्यावर त्या धर्माच्या प्रसारासाठी अशोकानी तत्वज्ञानापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर, नैतिक आचरणावर भर दिला. दया, क्षमा, शांती व अहिंसा या तत्वाचा सर्वांनी अंगीकार करावा गुरुजन व वडीलधाऱ्याचा



Off. Principal
Late. N.P.W. College

आदर करावा, सर्वांसोबत प्रेमाणे समानतेने वागावे, राजवाडयात चालणाऱ्या सर्व मैफीली, मद्य, प्राणीहत्या, नाच–गाणी बंद करण्यात आले. लोककल्याणकारी कामे सुरु केले.

उदा. दवाखाने काढणे, अन्न, छत्रालये सुरु करणे रस्ते बांधणे, रस्त्याच्या दुतर्फा सावलीसाठी झाडे लावली जेणे करून रस्त्यांनी जाणाऱ्या येणाऱ्या यात्रेकरुना विश्रांती घेण्यासाठी सावली मिळावी. मैला–मैलावर विहिरी खोदल्या जेणेकरून यात्रेकरून पिण्याचे पाणी सुलभ मिळेल. औषधीच्या दृष्टीने आवश्यक वनस्पती बोलावुन त्याच्या बागा तयार केल्या मानवकल्याणाबरोबरच पशूसाठी दवाखाने काढले. मुक्या प्रमाण्यासाठी दवाखाणे काढणारा अशोक हा पहिला सम्राट असावा.

अशोकाची जवळपास 40 वर्षाची कारकीर्द अतीशय महत्वपूर्ण समजली जाते. समृध्द अश्या कलिंग प्रदेशावर इ स. पूर्व 261 मध्ये आक्रमण करून तो प्रदेश जिंकूण घेतला परंतू रणमैदानात झालेला रक्तपात बघून अशोकाचे मन द्रवले आणि अशोकानी स्वतःलाच प्रश्न विचारला की, समृध्द प्रदेशावर आक्रमण करून आपण काय मिळवले तर निर्जीव दगड–धोंडे आणि माती व काय गमावले तर जित्या–जागत्या जीवंत माणसाची मणे केवळ महत्वकांक्षेपोटी एवढा संहार घडून आला. राज्य करायचे ते निर्जीव दगड धोंडयावर की जिवंत माणसांवर. कलिंग युध्दातील दृश्य बघून अशोकांनी आपल्या मनात ठरवल की यानंतर हातात तलवार घेणार नाही व युध्द करणार नाही. जे युध्दाने होत नाही ते प्रेमाणी होते म्हणुन युध्दा ऐवजी आपण प्रेमाणी जग जिंकु असे अशोकाला वाटले आणि त्यानंतर अहिंसेवर आधारीत शांततेचा मार्ग स्विकारण्याचे ठरविले. बोध्दभिक्षु उपगुप्ताच्या मददतीने बौदध धर्माचा स्विकार करून सर्व जगाला शांतीचा प्रेमाचा व अहिंसेचा मार्ग दिला. सम्राट अशोकांना भारतातील संस्कृतीतील विविध अंगाना मोठी सपन्नता प्राप्त करून दिली. सम्राट अशोक एक चक्रवती सम्राट होता. परंतू सत्येचा स्वतःसाठी उपयोग न करता जनकल्याणाचाच जास्तीत जास्त विचार करीत असे. वाईट कृत्यांची पुनरावृत्ती होवू दयायची नाही. उलट चांगल्या मार्गांनी वाईट केले ते भरून काढायचे असे त्यांचे मत होते. घेतलेला शांतीचा मार्ग स्वतः पूरताच मर्यादेत न ठेवता तो सर्वांनी स्विकारावा यासाठी प्रयत्न केले व आपली संपूर्ण शासन यंत्रणा बौध्द धर्माच्या प्रसारासाठी राबविली आपला आदर्श जनतेनी घ्यावा म्हणुन आपल्या अंगी सदगुण आणले. बौध्द धर्म स्विकारण्यास कोणालाही जबरदस्तीने भाग पाडले नाही. सत्ये व अहिंसेवर आधारलेले धर्म हा सर्वोच्च कल्याणाचा मार्ग आहे असे अशोकाला वाटले.

एकंदरीत कलिंग युध्दातील रक्तपात व जखमीनचे ओरडणे ऐकुण अशोकाचे मन द्रवले व कलिंग युध्दातील रक्तपातानींच सम्राट अशोकाचे मन परिवर्तीत होऊन बौध्द धर्म स्विकारला.

सम्राट अशोक प्राचीन भारताच्याच इतिहासात नव्हे तर, जगाच्या इतिहासात सुध्दा आपल्या कार्यामुळे प्रसिध्द आहे.

## निष्कर्ष

कलिंग युध्दातील विजयानंतर सम्राट अशोकानी बौध्द धर्म स्विकारला त्या धर्मातील अहिंसा तत्वांना फार महत्व दिल्यागेल्यामुळे क्षात्रतेज कमी झाले आणि परिणामी मौर्य साम्राज्य पतनाकडे वळले. हिंसेचा त्याग केल्यामुळे शिकार करण्यास बंदी घालण्यात आली. सैन्यांना काम नसल्यामुळे सैन्यांना आळसात दिवस घालवावे लागले आणि सैन्यांमधील काम करण्याची वृत्ती कमी झाली. उत्साह नष्ट झाला. अशोकानी संपूर्ण शासनयंत्रणा बौध्द धर्माच्या प्रसारासाठी राबविली त्यामुळे बौध्द–धर्माचा प्रसार देशात व विदेशात फार झपाटयाने घडून आला. राजाचे ...



Off. Principal
Late N. P. W. College
Ref. No.
Dt.
Scanned with CamScanner

राज्यकरणे, असते धर्म प्रसार करणे नाही, सैन्यानी देशाच्या रक्षणाच्या कामाऐवजी धर्मप्रसाराचे काम केल्यामुळे सैनीकांचे कसब कमी झाले. आणि कालांतर मौर्य साम्राज्यावर परकीयांची झालेली आक्रमणे परतावून लावू शकले नाही. त्यामुळे मौर्य साम्राज्याचे पतन जवळ आले.

**संदर्भ सुची**

१. आपटे वासुदेव गोविंद : ''सम्राट अशोक चरित्र'' वर्धा प्रकाशन

२. कोलारकर : रा.गो.श्री. मंगेश प्रकाशन नागपूर.

३. दिक्षित नी.सी. : ''भारताचा इतिहास'' प्रारंभापासुन इ.स.1761 पर्यत पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर.

४. भोला, यामीनी,रचना : 'चक्रवती सम्राट अशोक'' प्रभात प्रकाशन

५. मुळे मंजुषा : ''महान सम्राट अशोक'' रिया पब्लीकेशन

६. सिंग राजविर : ''सम्राट अशोक'' पी.एम. पब्लीकेशन

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani Distt. Bhandara
Ref No.
Dt.